N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

वरिष्ठ पोलीस निरीक्षक पनवेल शहर पोलीस ठाणे नवी मुंबई

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** पनवेल शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0522 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/08/2024 01:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 22/08/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/08/2024

**Time From (वेळेपासून):** 13:43 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/08/2024 **Time (वेळ):** 00:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/08/2024 01:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पनवेल तहसिल कार्यालय,पनवेल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संतोश रमेशचंद्र जयस्वाल
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उल्वे नवी मुंबई ,पनवेल शहर ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उल्वे नवी मुंबई ,पनवेल शहर ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9768145469

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आनंद श्यामराव गुरव | | | 1. साई आशिष बिल्डींग,,फ्लट नं101, सेक्टर नं4, करंजाडे, पनवेल ,पनवेल शहर ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दि 23/08/24

सहायक पोलीस निरीक्षक सपोनि सुनिल वाघ निवेदन करतात कि, पोलीस निरीक्षक संतोष पाटील, एसीबी, नवी मुंबई यांनी समक्ष हजर राहुन कळविले कि, संतोष रमेशचंद्र जयस्वाल, वय- 34 वर्षे, नोकरी- खाजगी कंपनीत, राहणार गौरी लक्ष्मी को.ऑप. हौसिंग सोसायटी, फ्लॅट नं. 502, सेक्टर नं. 17, उलवे, नवी मुंबई यांनी दि. 21/08/2024 रोजी समक्ष एसीबी, नवी मुंबई कार्यालयात हजर राहुन कळविले कि,

त्यांचे वडील नामे रमेशचंद्र जयस्वाल यांचे वय सुमारे 61 वर्षे, असून ते पुर्वी टॅक्सी चालवून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित होते. सध्या त्यांना उत्पन्नाचा काहीही स्त्रोत नाही. रमेशचंद्र जयस्वाल यांच्या नावे शिधावाटप कार्यालय, पनवेल येथे केशरी रंगाचे रेशनिंग कार्ड रायगड शिधावाटप क्षेत्रात कोड नं. 1646 मध्ये नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्रमांक 1535460 असा आहे. सदर रेशनिंग कार्डवर पुर्वीचे उत्पन्न रू.80,000/- इतके नोंद होते. परंतु सध्या त्यांना कोणतेही उत्पन्न नसल्याने पुर्वीचे उत्पन्नामध्ये बदल होवून नविन उत्पन्नाची रेशनिंग कार्डवर नोंद होणेसाठी तक्रारदार यांनी दिनांक 29/07/2024 रोजी तहसिल कार्यालय, पनवेल येथील शिधावाटप कार्यालय येथे जावून त्याबाबत चौकशी केली असता, सदर कार्यालयात उपस्थित असलेले कार्यालयीन कर्मचारी यांनी त्यांना वरीलप्रमाणे वडीलांच्या उत्पन्नाची नव्याने नोंद घेता येणार नाही असे सांगितले.

परंतु तहसिल कार्यालय, पनवेल येथील शिधावाटप कार्यालयाचे आवारात असलेले खाजगी इसम आनंद गुरव यांनी तक्रारदार यांचे वडील नामे रमेशचंद्र जयस्वाल यांच्या नावे असलेल्या रेशनिंग कार्डवरील पुर्वी नोंद असलेल्या रू. 80,000/- उत्पन्नाची नोंद कमी करून त्याऐवजी रू. 40,000/- उत्पन्नाची नोंद करून दिल्याने मोबदला म्हणून तक्रारदार यांच्याकडे खाजगी इसम आनंद गुरव हे साहेबांसाठी म्हणून रू. 4,500/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असलेबाबत दिनांक 21/08/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली होती.

तरी सदर तक्रारीच्या अनुशंगाने दि. 22/08/2024 रोजी पंचांसमक्ष केलेल्या लाचेच्या मागणीचे सत्यता पडताळणी दरम्यान आनंद गुरव यांनी तक्रारदार यांचे वडील नामे रमेशचंद्र जयस्वाल यांच्या नावे असलेल्या रेशनिंग कार्डवरील पुर्वी नोंद असलेल्या रू. 80,000/- उत्पन्नाची नोंद कमी करून त्याऐवजी रू. 40,000/- उत्पन्नाची नोंद करून दिल्याने मोबादला म्हणून तक्रारदार यांच्याकडे खाजगी इसम आनंद गुरव यांनी साहेबांसाठी म्हणून रू. 4,500/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून सदरची रक्कम स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्याअनुशंगाने आजमविलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम आनंद गुरव यांनी तक्रारदार यांच्याकडून रू. 4,500/- लाचेची रक्कम स्विकारली असता, आनंद गुरव यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून तक्रारदार यांची खाजगी इसम आनंद श्यामराव गुरव वय 32 वर्षे, राहणार साईआशिष बिल्डींग, रुम नं. 101, प्लॉट नं. 148, सेक्टर 04, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या विरूध्द कायदेशिर फिर्याद आहे. तरी सदर फिर्यादीच्या अनुशंगाने आनंद श्यामराव गुरव वय 32 वर्षे, राहणार साईआशिष बिल्डींग, रुम नं. 101, प्लॉट नं. 148, सेक्टर 04, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड यांचे विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन 2018) कलम 7 (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे. सोबत सविस्तर फिर्याद पृश्ठ क्र. 01 ते क्र. 04 नुसार सोबत जोडण्यात आलेली आहे.

<u>फिर्याद</u>

पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई.
दिनांक २३/०८/२०२४

मी, संतोष रमेशचंद्र जयस्वाल, वय- ३४ वर्षे, नोकरी- खाजगी कंपनीत, राहणार गौरी लक्ष्मी को.ऑप. हौसिंग सोसायटी, फ्लॅट नं. ५०२, सेक्टर नं. १७, उलवे, नवी मुंबई, आधारकार्ड नं. ९५०३८६०२४४३८, ई-मेल आय.डी. santoshjaysawal@gmail.com मो.नं. ९७६८१४५४६९ समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वर नमुद प्रमाणे असुन वरील ठिकाणी माझे कुटूंबियांस राहण्यास आहे. मी नेरूळ, नवी मुंबई येथील खासगी कंपनीत कार्यरत आहे.

माझे वडील नामे रमेशचंद्र जयस्वाल यांचे वय सुमारे ६१ वर्षे, असून ते पुर्वी टॅक्सी चालवून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित होते. सध्या त्यांना उत्पन्नाचा काहीही स्त्रोत नाही. माझे वडीलांच्या नावे शिधावाटप कार्यालय, पनवेल येथे केशरी रंगाचे रेशनिंग कार्ड रायगड शिधावाटप क्षेत्रात कोड नं. १६४६ मध्ये नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्रमांक १५३५४६० असा आहे. सदर रेशनिंग कार्डवर माझे वडीलांचे पुर्वीचे उत्पन्न रू.८०,०००/- इतके नोंद होते. परंतु वडीलांना सध्या कोणतेही उत्पन्न नसल्याने पुर्वीचे उत्पन्नामध्ये बदल होवून नविन उत्पन्नाची रेशनिंग कार्डवर नोंद होणेसाठी मी दिनांक २९/०७/२०२४ रोजी तहसिल कार्यालय, पनवेल येथील शिधावाटप कार्यालय येथे जावून त्याबाबत चौकशी केली असता, सदर कार्यालयात उपस्थित असलेले कार्यालयीन कर्मचारी यांनी मला वरीलप्रमाणे वडीलांच्या उत्पन्नाची नव्याने नोंद घेता येणार नाही असे सांगितले. सदर कर्मचारी यांचे नाव मला माहित नाही.

त्यानंतर मी कामाच्या अनुषगांने चौकशी करण्यासाठी शिधावाटप कार्यालयामध्ये बराच वेळ थांबल्यानंतर बाहेर येत असताना कार्यालया मध्ये उपस्थित असलेला एक इसम माझेजवळ आला व त्याने मला माझे कामाबाबत चौकशी केली. त्यावेळी सदर इसमाकडे त्याचे नाव व कामाबाबत चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव आनंद गुरव असे मला सांगितले. त्यावर मी त्याला वडीलांच्या उत्पन्नाचे नविन नोंदीचे काम असल्याचे सांगितले. त्यावेळी आनंद गुरव याने ' काळजी करू नका, साहेब करून देतील माझे ओळखीचे आहेत, थांबा थोडे इथे ' असे मला सांगून माझेकडील रेशनिंग कार्ड घेवून मला बाहेर थांबण्यास सांगून तो शिधावाटप कार्यालयात थांबून राहिला. काही वेळाने आनंद गुरव शिधावाटप कार्यालयातुन बाहेर आला व त्याने मला ' रेशनिंग कार्डवर यापुर्वी रू. ८०,०००/- उत्पन्न दाखविले आहे ते रू. ४०,०००/- पर्यंत होवू शकते ' असे सांगितले. त्यावर मी त्यांना वडीलांना सध्या काहीच उत्पन्न मिळत नसल्याचे सांगितले. त्यावर आनंद गुरव यांनी ' यापेक्षा कमी होणार नाही. रू. ४०,०००/- पर्यंतच कमी होईल असे मला सांगितले. त्यावेळी मी आनंद गुरव यांच्याकडे नविन उत्पन्नाचे नोंदीसाठी लागणारे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, त्याने तुम्ही काही काळजी करू नका मी सगळं करून घेतो असे मला सांगून माझे वडीलांच्या नावे असलेले मुळ रेशनिंग कार्ड त्यांच्याकडे ठेवून घेतले. त्यावेळी माझा मुलगा नामे अंश जयस्वाल, वय- ०२ वर्षे, याचेदेखिल रेशनिंगकार्डवर नाव नोंदणी करायचे असल्याबाबत आनंद गुरव यांना बोललो असता, त्यांनी माझेकडून मुलाचे जन्माचा दाखला घेवून या त्यावेळी त्याचीही नोंद करून घेतो असे सांगितले.

त्यानंतर मी वेळोवेळी आनंद गुरव यांना माझे वडीलांच्या नावे असलेल्या रेशनिंगकार्डवरील उत्पन्न नोंदणी व माझे मुलाचे नाव नोंदणीच्या अनुषंगाने फोनकरून तसेच व्हॉट्सअप मॅसेजव्दारे चौकशी केली असता, आनंद गुरव हे मला ' मोठे साहेब बाहेर आहेत ' असे मला सांगत होते.

23/08/24
सुनिल भाऊराव ...
सहाय्यक पोलीस निरीक्षक
पनवेल शहर पोलीस ठाणे

23/08/2024

त्यानंतर दिनांक ०६/०८/२०२४ मी आनंद गुरव यांना फोन केला असता, आनंद गुरव यांनी त्यांचे व्हॉट्सअप मोबाईल नं. ९७६८६८२००५ वरून माझे व्हॉट्सअप मोबाईल नं. ९७६८१४५४६९ वर वडीलाचे रेशनिंग कार्डचा फोटो पाठवून त्यावर वडीलांचे उत्पन्नाची रू. ४०,०००/- नोंद तसेच माझा मुलगा अंश जयस्वाल याचे नावाचे नोंदणी देखिल केली असल्याबाबत मला सांगितले. त्यावेळी मी आनंद गुरव यांच्याकडे रेशनिंग कार्ड कधी घेण्यास येवू अशी विचारणा केली असता, आनंद गुरव याने उत्पन्नाची नोंद रू. ४०,०००/- करण्यासाठी साहेबांना रू. ४,५००/- दयावे लागतील आणि बाकीच्या कागदपत्रांच्या कामासाठी त्याला वेगळे दयावे लागतील असे मला सांगितले. त्यावेळी मी ' सदरची रक्कम शासकीय फी आहे का किंवा तुम्ही रेशनिंग कार्ड घेताना पैश्याबाबत काहीही बोलला नाहीत आणि इतकी रक्कम देणे मला शक्य नाही ' असे आनंद गुरव यांना बोललो असता, आनंद गुरव यांनी सदरची रक्कम ही शासकीय फी नसुन ते पैसे साहेबांना दयावे लागतात असे बोलुन तडजोड करून मला सर्व रक्कम मिळून रू.४,५००/- फायनल दयावे लागतील नाहीतर रेशनिंग कार्ड भेटणार नाही असे सांगितले.

तहसिल कार्यालय, पनवेल येथील शिधावाटप कार्यालय येथे असणारे आनंद गुरव यांनी शिधावाटप कार्यालयातील साहेबांसाठी व त्यांचेसाठी मागणी केलेली रक्कम ही लाच असून सदरची रक्कम मी त्यांना दिली नाही तर माझे वडीलांचे मुळ रेशनिंग कार्ड मला देणार नाहीत अशी माझी खात्री झालेली आहे. तरी तहसिल कार्यालय, पनवेल येथील शिधावाटप कार्यालय येथे असणारे आनंद गुरव यांनी साहेबांकरीता मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. तसेच आनंद गुरव यांनी सदरची रक्कम ही शासकीय फी व्यतिरिक्त माझेकडे मागणी केलेली रक्कम ही लाच असल्याने त्याचे विरूध्द कायदेशिर कारवाई होणेबाबत मी दिनांक २१/०८/२०२४ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून तक्रार दिली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तकारीच्या अनुषंगाने लाचेच्या मागणीची सत्यता पडताळणी करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री संतोष पाटील यांनी मा. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी 'डी' विभाग, तुर्भे वॉर्ड कार्यालय, नवी मुंबई तसेच मा. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी 'जी' विभाग, ऐरोली वॉर्ड कार्यालय, नवी मुंबई कार्यालयास लेखी पत्र देऊन दोन शासकिय पंच साक्षीदार मागविले. पंच साक्षीदार अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर पोनि श्री संतोष पाटील यांनी पंचांना माझी ओळख करून दिली. सदरवेळी मी, पंच साक्षीदार यांना माझे तकारीची थोडक्यात हकिकत सांगितल्यानंतर पोनि संतोष पाटील यांनी माझी तक्रार पंचाना वाचण्यास दिली असता पंचानी सदरची तक्रार वाचुन त्यावर सही केली. त्याचवेळी पोनि संतोष पाटील यांनी मला सदर पडताळणी पथकातील पोलीस अंमलदारांची ओळख करून दिली.

त्यानंतर पोनि संतोष पाटील यांनी मला विचारले की, आनंद गुरव हे कोठे भेटतील त्याप्रमाणे मी सांगितले की, ते तहसिल कार्यालय, पनवेल याठिकाणी भेटतील.

त्यानंतर मी, पंच साक्षीदार तसेच पडताळणी पथक असे पोनि. संतोष पाटील यांचे खाजगी किया सेल्टास गाडी कमांक एमएच ४३ बी.यु ९४९३ व प्रवासी ऑटो रिक्षाने अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयातुन साहित्यासह पनवेल तहसिल कार्यालया समोरील साईनगरकडे जाणा-या रोडवर येऊन थांबलो.

त्यानंतर मी, डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच साक्षीदार यांचे समवेत आनंद गुरव यांना भेटण्याकरीता पनवेल तहसिल कार्यालय येथे गेलो असता, पनवेल तहसिल कार्यालय समोरील रोडवर

Jayswal
23/08/2024

असलेल्या पिवळ्या रंगाचे लोखंडी स्टॉलमध्ये आनंद गुरव हे बसले असल्याचे मला दिसले. त्यावेळी मी पंचांना आनंद गुरव यांच्याबाबत इशारा करून सांगितल्यावर मी सदर स्टॉलजवळ जावून आनंद गुरव यांना भेटलो. त्यावेळी आनंद गुरव यांनी मला पैसेबाबत विचारणा केली, त्यावेळी मी प्रॉब्लेम असल्याचे सांगितले. त्यावर आनंद गुरव हे मला " **तुमचे काय चार पाच हजार रूपये घेवून कूठे जाणार नाही..... विषय काय असतो किती दिवस झाले पेमेंन्ट....आम्ही काय खिश्यातून पेमेंन्ट टाकायच का...**" असे बोलले असता, मी त्यांना पैश्याचा प्रॉब्लेम असल्याचे सांगितले. त्यानंतर मी आनंद गुरव यांना उत्पन्नाच्या नोंद ऑनलाईन दिसत नसल्याचे सांगितले असता, आनंद गुरव यांनी मला " **हा मग करून देतो ना ऑनलाईन करून देतो तुम्ही भेटतच नाय..... पैसे देत नाय कसे काय आम्ही करणार... ...प्रत्येक गोष्ट....सगळ्या गोष्टीला पैसे लागतात...विदआउट पैश्याशिवाय कुठल काम होत नाही ना..** असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना " **ते तर आहे भाउ तेच बोललो मी आता पैशांचा एवढ टेन्शन झालय ना....माझे थोडे प्रॉब्लेम चालू आहेत**'' असे बोललो असता, आनंद गुरव यांनी " **पैसे नसेल तर काम थोड थांबायच आणि नंतर करून घ्यायच विषय ते नाहीये......आम्हांला ते थांबत नाही ना.**'' असे मला सांगितले. त्यावेळी माझे रेशनिंग कार्ड ऑनलाईन दिसत नसल्याचे मी त्यांना सांगितले असता, त्यांनी ऑनलाईन मध्ये फोरटी फाय दिवस लागतात असे मला सांगितले. त्यानंतर मी " **मला त्यानेच मला बोलला का हे चाळीस हजार दिसतय ना ते ऐंशी हजार इकडे इग्लिश मराठीमध्ये लिहीलय....आणि चाळीस हजार कस काय इग्लिशमध्ये**'' असे बोललो असता, त्याने मला " **साहेबांचा टाकताना ते हे करून दिला त्यांनी** '' असे सांगितले त्यावेळी मी त्यांना " **ते बोलले पैसे देतोय साडेचार हजार तेव्हा ते क्लिअर करून घे कस आहे ते उदया तु त्याला बोलणार तो.**'' असे बोललो असता, आनंद गुरव यांनी मला " **मी काय बोलतोय ऑन लाईन नाय दिसल तर मला बोलायच......पैसे आणलेत आता.**'' असे सांगितले. त्यावेळी मी " **आता आणतोय जावुन**'' असे आनंद गुरव यांना बोललो त्यावेळी त्याने मला " **घेवुन या... पैसे घेवुन या** '' असे सांगितले. त्यानंतर मी " **पण मी तेच दादा मला थोड टेन्शन आलय कस आहे की पोपट नाय व्हायला पाहिजे....साडेचार हजार पण देवून आपल**" असे बोललो असता, आनंद गुरव यांने मला " **ऑनलाईन दिसेल व्यवस्थीत झालना ऑनलाईन नाय दिसेल तर मला बोल तु तु जा पैसे घेवुन ये पहिला'' सगळ झालय...तु फक्त मला पैसे आणुन दे मी तूला बाकीच सांगेण विदआउट पैश्याच विचारू नको आणि मी कोणाला उत्तर पण देत नाय.'' तुम्ही जावुन घेवुन या... मी दोन वाजेपर्यंत आहे** '' असे सांगितले. त्यानंतर मी व पंच असे पडताळणी पथकाजवळ परत आलो.

अशाप्रकारे, पनवेल तहसिल कार्यालयातील शिधावाटप कार्यालय येथे असणारे आनंद गुरव यांनी माझे वडील नामे रमेशचंद्र जयस्वाल याचे नावे असलेल्या रेशनिंग कार्डवरील पुर्वी नोंद असलेल्या रू. ८०,०००/- उत्पन्नाची नोंद कमी करून त्याऐवजी रू. ४०,०००/- उत्पन्नाची नोंद करून दिल्याने मोबादला म्हणून आनंद गुरव याने पनवेल तहसिल कार्यालय, शिधावाटप कार्यालयातील साहेबासाठी व त्यांचेसाठी रुपये ४,५००/-लाचेच्या रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे कबुल केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरूध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार सापळापुर्व कार्यवाही खाजगी वाहनात पुर्ण करून सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंचाना तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लाचेची रक्कम घेवून पंच साक्षीदार यांचे समवेत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह तहसिल कार्यालय, पनवेल समोर असलेल्या आनंद गुरव यांचे स्टॉल जवळ जावून आनंद गुरव यांना भेटलो. त्यावेळी मी, आनंद गुरव यांना " **आनंदभाऊ पैसे आणलेत मी...ते दया ना रेशनिंग कार्ड**'' असे बोललो असता, त्यावेळी त्यांनी" **मी घ्यायलाच बसलोय ना.. मी कुठे हाय...**

असे मला सांगून त्यांच्या टेबलामधून एक केशरी रंगाचे रेशनिंगकार्ड बाहेर काढून माझेकडे दिले. त्यावेळी सदरचे मेमरीकार्ड हे माझे वडीलांच्या नावे असल्याची खात्री केल्यानंतर मी आनंद गुरव यांना उत्पन्नाचे नोंदीच्या अनुषंगाने " **मला हे ऑनलाईन करुन द्या.. हा..''** असे बोललो असता, त्यांनी मला " **ऑनलाईन करुन देतो...टेंशन घेवु नको हे बघ आम्ही कुणाकडुन पैसे घेतो म्हणजे आम्ही त्याचे काम पुर्णपणे करुन देतो.. आणि तुझे दोन हजार.. पाच हजार आम्हाला काही होत नाही."** असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना " **नाय ते रेशनिंग चालु करण्यासाठी एवढी मगचमारी....तुम्हांला माहिति कशाला मी पैसे. साडेचार हजार देणार तुम्हांला कशाला ते मगजमारी. हे..घ्या..''** असे बोलून माझे उजव्या हाताने पॅन्टच्या पुढील उजव्या खिश्यामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम बाहेर काढून आनंद गुरव यांच्यासमोर धरली. त्यावेळी आनंद गुरव यांनी सदरची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारली असता, मी त्यांना " **मोजुन घ्या....पैसै....मोजुन घ्या हां...नाही तर परत... "** असे बोललो. त्यानंतर आमच्यामध्ये बोलणे चालू असताना मी माझे डाव्या हाताने उजव्या हाताचे शर्टची बाहीवर करून आनंद गुरव यांनी माझेकडून लाचेच्या रक्कमेचा स्विकार केला असल्याबाबत सापळा पथकास इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने त्याला ताब्यात घेतले. ती वेळ १३.४३ वाजताची होती. त्यानंतर पोनि संतोष पाटील यांनी त्याचे नाव, पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव आनंद श्यामराव गुरव वय ३२ वर्षे, राहणार साईआशिष बिल्डींग, रुम नं. १०१, प्लॉट नं. १४८, सेक्टर ०४, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड असे असल्याचे सांगुन त्याने पनवेल तहसिल कार्यालयात एजंट म्हणुन कामकाज करतो असे सांगितले. त्यानंतर सापळा पंचनामाची पुढील कारवाई पनवेल तालुका पोलीस ठाणे जवळील मंथन हॉल येथे पूर्ण करण्यात आली.

तरी पनवेल तहसिल कार्यालयातील खाजगी इसम आनंद श्यामराव गुरव वय ३२ वर्षे, राहणार साईआशिष बिल्डींग, रुम नं. १०१, प्लॉट नं. १४८, सेक्टर ०४, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी माझे वडील नामे रमेशचंद्र जयस्वाल यांचे नावे असलेल्या रेशनिंग कार्डवरील पुर्वी नोंद असलेल्या रू. ८०,०००/- उत्पन्नाची नोंद कमी करून त्याऐवजी रू. ४०,०००/- उत्पन्नाची नोंद करून दिल्याने मोबादला म्हणून आनंद गुरव याने पनवेल तहसिल कार्यालय, शिधावाटप कार्यालयातील साहेबासाठी व त्यांचेसाठी रुपये ४,५००/-लाचेच्या रक्कमेची मागणी करून ती स्विकारण्याचे कबुल केले. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान आनंद गुरव याने माझेकडुन लाचेची रक्कम रू.४,५००/- स्विकारले असता, त्यांना पनवेल तहसिल कार्यालय समोरील रोडवरील स्टॉलमध्ये लाचेच्या रक्कमेसह सापळा पथकाने रंगेहाथ ताब्यात घेतले आहे म्हणून माझी आनंद श्यामराव गुरव वय ३२ वर्षे, राहणार साईआशिष बिल्डींग, रुम नं. १०१, प्लॉट नं. १४८, सेक्टर ०४, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मी वाचुन पाहीला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

हे लिहून दिले सही

समक्ष

23/08/24

23/08/2024

(संतोष पाटील)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई